सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३५१ | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,४९,५००
२२ सोने ९१.६०% : ₹१,३९,०००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१५,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३५०/-
भाव प्रती १० ग्राम

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!

# अमळनेर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम वाया

## आमदार अनिल पाटील यांनी बांधावर जाऊन केली पीक पाहणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके पूर्णपणे हातची गेली असून तालुक्यातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार अनिल पाटील यांनी प्रत्यक्ष पीक पाहणी करत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यंदा पावसाने मोठा खंड दिल्याने कापूस पिकाची वाढ खुंटली असून पीक हातचे गेले आहे. मका पिकाला कणसेच न लागल्याने पीक पूर्णपणे सुकून गेले असून अनेक शेतकऱ्यांवर रोटाव्हेटर फिरवून ते जनावरांच्या चाऱ्यासाठी देण्याची वेळ आली आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी पिकांवर रोटा फिरवला आहे.

तालुक्यातील सुमारे ६० टक्के जमीन ही कोरडवाहू व भुराट स्वरूपाची असून या भागातील पिके जवळपास पूर्णपणे गेली आहेत. केवळ ४० टक्के भागात काळीची (काळी कसदार) जमीन असल्याने तेथे ५० टक्के पिके येण्याची आशा आहे. मात्र आता सुरू असलेला पाऊस जर जोरदार बरसला तर तेथील कापूस पीकही पूर्णपणे हातचे जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.आता पाऊस येत असला तरी त्याचा पिकांना फायदा होणार नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार अनिल पाटील यांनी शेतात जाऊन कापूस व मका पिकांची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.

"अमळनेर तालुक्यात खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला असून शेतकरी संकटात आहे. या परिस्थितीत शेतकरी बांधवांना आधार मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत," असे आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.यावेळी त्यांच्यासोबत मार्केटचे माजी संचालक अनिल शिसोदे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष चेतन राजपुत, महेश पाटील (बाम्हणे) यासह शेतकरी बांधव उपस्थित होते.

दरम्यान, आमदार पाटील यांनी नुकतेच शासन दरबारी मुख्यमंत्री व संबधित खात्याच्या मंत्री महोदयांना पत्र देऊन अमळनेर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे.



*अमळनेर : तालुक्यातील खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्याने प्रत्यक्ष बांधावर जावून पाहणी करताना आमदार अनिलदादा पाटील, अनिल शिसोदे, चेतन राजपूत, महेश पाटील आदी.*

# अमळनेर शहराचे तापमान कमी करण्यासाठी १८ हजार झाडांची लागवड

## नगरपालिका आणि महिला हौसिंग ट्रस्टचा संयुक्त हरित उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराचे वाढते तापमान कमी करण्यासोबतच अमळनेर शहर अधिक हिरवेगार करण्यासाठी अमळनेर नगरपरिषद आणि महिला हौसिंग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी ९ सप्टेंबर रोजी अमळनेर नगरपरिषदेच्या सभागृहात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

नगरपरिषदेतील सर्व विभागांतील नगरसेवक, महिला हौसिंग ट्रस्टचे प्रतिनिधी तसेच स्टेकहोल्डर कन्सल्टंट यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत शहरातील वृक्षारोपणाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. ग्रीन आणि ब्ल्यू डीपीआरच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षांत शहरात सुमारे १८ हजार झाडांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले असून, या माध्यमातून शहराचे हरित क्षेत्र वाढवून तापमान कमी करण्यास मदत होणार आहे.

वृक्षारोपणासाठी शहरातील विविध ठिकाणांचे मॅपिंग करण्यात आले आहे. यामध्ये ओपन स्पेस, वॉटर बॉडीज, भौगोलिकदृष्ट्या योग्य ठिकाणे तसेच रस्त्यांच्या दुतर्फा उपलब्ध जागांचा समावेश आहे. अमळनेर शहरातील १८ विभागांमध्ये वृक्षारोपणासाठी योग्य जागा निश्चित करण्याच्या दृष्टीने संबंधित नगरसेवकांशी चर्चा करण्यात आली.



प्रत्येक विभागात उपलब्ध असलेल्या जागांचा योग्य वापर करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्यावर भर देण्यात येणार आहे. यामुळे शहरातील हरित क्षेत्र वाढण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन, सावली आणि भविष्यात तापमान नियंत्रणासाठीही मदत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

बैठकीस अमळनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, आरोग्य विभागाचे अधिकारी जाधव, मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, रोटरी क्लबचे सदस्य तसेच सर्व विभागांतील नगरसेवक उपस्थित होते.

# दहावीच्या मुलीच्या आत्महत्येप्रकरणी भाऊ बहिणीवर गुन्हा दाखल...

## बळजबरी प्रेम संबंध ठेवण्याच्या कारणावरून आत्महत्या केल्याचे उघड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षक दिनी तालुक्यातील कावपिंप्री येथील दहावीच्या मुलीच्या आत्महत्या प्रकरणी दोघा भाऊ बहिणीवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून बळजबरी प्रेम संबंध ठेवण्याच्या कारणावरून तरुणीने आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

तालुक्यातील कावपिंप्री येथील माध्यमिक शाळेत १० वीला शिकणारी अनुष्का रवींद्र सपकाळे हिने ५ रोजी दुपारी स्वतःच्या राहत्या घरी साडी ने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. विशेष म्हणजे त्यादिवशी सकाळी ती शाळेत शिक्षिका बनली होती.

या प्रकरणात मयत मुलीची आजी शोभाबाई बळीराम सोनवणे हिने फिर्याद दिली की एक महिन्यांपूर्वी तिची नात अनुष्का हिने तिच्या आजीला सांगितले होते की , त्यांच्या घरामागे राहणारा स्वप्नील जयवंतराव पवार मूळ रा चौगाव ता चोपडा ह. मु. कावपिंप्री हा अनुष्काला म्हणाला होता की तू मला आवडते तू माझ्याशी प्रेम संबंध ठेव म्हणून त्रास देत होता. त्याची बहीण रुपाली आंनद अहिरे ही देखील अनुष्काला स्वप्नीलशी प्रेम संबंध ठेवण्यास बळजबरी करत होती. याबाबत अनुष्काने आजीला सांगितले होते की या दोघांना समजावून सांग नाही तर मी स्वतःचे काही तरी करून घेईल आणि आजीने त्या दोघांना अनुष्का लहान आहे तिला मानसिक त्रास देवू नका असे सांगितले होते. तरी देखील दोन्ही त्रास देत होते आणि त्यांनी आजीला देखील शिवीगाळ केली होती. ५ रोजी दुपारी अडीच वाजता आजी शोभाबाई भरवस येथे अंत्ययात्रेला गेली होती. अनुष्काने गळफास घेत आपले जीवन संपवले होते.

त्यांनतर काही लोकांनी असे सांगितले होते की ५ रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास स्वप्नील अनुष्काच्या घरात घुसला होता. आणि रुपाली अहिरे ही अनुष्काला शिवीगाळ करत होती. यावरून तड त्रास देत असल्याचे स्पष्ट झाल्याने शोभाबाई च्या फोर्यादिवरून स्वप्नील आणि रुपाली या दोन्ही भाऊ बहीण विरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम १०८ , ३५१(२), ३५२ प्रमाणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे करीत आहेत.

# मोटारसायकल स्लिप होऊन डोक्याला गंभीर दुखापत

## ४० वर्षीय इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मोटारसायकल स्लिप होऊन डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पाचोरा तालुक्यातील ४० वर्षीय इसमाचा मेंदू मृत (ब्रेन डेड) झाल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना २ सप्टेंबर रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास घडली.

पाचोरा तालुक्यातील कृष्णापुरी येथील योगेश शिवाजी पाटील (वय ४०) हे २८ ऑगस्ट रोजी आपल्या मुलांसह अमळनेर तालुक्यातील सडावण येथून जात असताना त्यांची मोटारसायकल स्लिप झाली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. आजूबाजूच्या नागरिकांनी त्यांना तातडीने पारोळा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मित्र व नातेवाईकांनी त्यांना पुढील उपचारासाठी पाचोरा येथील वृंदावन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने तेथील डॉक्टरांनी न्यूरोसर्जनकडे उपचार घेण्याचा सल्ला दिला. त्यानंतर २९ ऑगस्ट रोजी योगेश पाटील यांना डॉ. राजेश जैन यांच्याकडे नेण्यात आले. तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांचा मेंदू मृत झाल्याचे सांगून त्यांना सिव्हिल हॉस्पिटल, जळगाव येथे नेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांना जळगाव येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, २ सप्टेंबर रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी त्यांचे चुलत भाऊ मिलिंद आत्माराम पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल लक्ष्मीकांत शिंपी करीत आहेत.

# भटक्या कुत्र्यांची नसबंदी, लसीकरण मोहीम सुरू

## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ढेकू रोड परिसरातून सुरुवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या संख्येला आळा घालण्यासह नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अमळनेर नगरपरिषदेतर्फे ABC (Animal Birth Control) कार्यक्रमांतर्गत भटक्या कुत्र्यांची नसबंदी व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे.

नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाच्या माहितीनुसार, मोहिमेंतर्गत शहरातील मोकाट कुत्र्यांना नियमानुसार पकडून ABC सेंटरमध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली

पान २ वर




# '८० चा ट्रेंड'च्या मोहात गोपनीयता धोक्यात

## कौटुंबिक फोटो अपलोड करण्यापूर्वी सायबर तज्ज्ञांचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सोशल मीडियावर युझर्सना १९८० च्या दशकातील विंटेज लूकमध्ये दाखवणारा '८०s ट्रेंड' लोकप्रिय ठरत आहे. सर्वसामान्यांपासून नामांकित व्यक्तींपर्यंत सर्वजण फोटो एडिट करून पोस्ट करत आहेत. मात्र, अनोळखी थर्ड-पार्टी ॲप्सवर स्वतःचे व कुटुंबीयांचे फोटो अपलोड करणे धोकादायक ठरू शकते, असा इशारा सायबर तज्ज्ञ ॲड. चैतन्य भंडारी यांनी दिला आहे.



ॲपवर फोटो अपलोड करताना चेहऱ्याची ठेवण, बारकावे, हावभाव आणि संवेदनशील बायोमेट्रिक माहिती सर्व्हरवर साठवली जाते. भविष्यात या डेटाचा गैरवापर करून डीपफेक, ओळख चोरी किंवा सायबर फसवणूक घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. युझर्स प्रायव्हसी पॉलिसी आणि नियम न वाचताच परवानग्या देऊन टाकतात. त्यामुळे कोणत्याही तात्पुरत्या ट्रेंडच्या आहारी जाऊन अनोळखी ॲपवर फोटो अपलोड करू नयेत. ॲप डेटा कसा साठवणार व वापरणार हे तपासल्याशिवाय कोणतीही कृती करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवासाठी अमळनेर आगाराच्या ३२ बसेस कोकणात रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी अमळनेर एसटी आगाराच्या ३२ बसेस १० सप्टेंबर रोजी कोकणाकडे रवाना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अमळनेर आगारातून विविध मार्गांवर होणाऱ्या एकूण १७८ बसफेऱ्या रद्द करण्यात आल्या असून २९ नियते रद्द करण्यात आली आहेत. या कालावधीत प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होण्याची शक्यता असून, प्रवाशांनी बसच्या वेळांची माहिती घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन आगार व्यवस्थापक राकेश शिवदे यांनी केले आहे.

महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नोकरी व व्यवसायानिमित्त राज्यातील विविध भागांत राहणारे कोकणवासीय गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने आपल्या गावी जातात. त्यांच्या सोयीसाठी शासनाच्या नियोजनानुसार राज्यातील विविध एसटी आगारांमधून विशेष बसेस कोकणाकडे रवाना करण्यात येतात.

त्यानुसार अमळनेर आगारातून ३२ एसटी बसेस कोकणासाठी सोडण्यात आल्या आहेत. या बसेससोबत ३२ चालक आणि ३२ वाहक देखील कोकणात रवाना झाले आहेत. परिणामी अमळनेर आगारातून सुटणाऱ्या नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, तुळजापूर, सुरत, पंढरपूर, धुळे, पारोळा, पिंगळवाडे, खडके, गांधली, तामसवाडी, हिंगोणे, पाडसे आदी मार्गांवरील एकूण १७८ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत.

या नियोजनामुळे काही स्थानिक गावांतील प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. मात्र, शासनाच्या आदेशानुसार धार्मिक उत्सवासाठी ही व्यवस्था करण्यात आली असल्याने नागरिकांनी याची नोंद घेऊन एसटी आगाराला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




"प्रवाशांनी बसफेऱ्यांच्या वेळांची माहिती घेऊनच प्रवास करावा. विद्यार्थ्यांनीही शक्यतो सायंकाळी अंधार पडण्यापूर्वी आपल्या गावी परतावे. पुढील दहा-बारा दिवसांत एसटीची सेवा पूर्ववत करण्यात येईल. नागरिकांनी सहकार्य करावे.

**– राकेश शिवदे,**
**आगार व्यवस्थापक, अमळनेर**

## संपादकीय

# वाघिणीची शिकार!

आपुलकी वाढण्यासाठी कोणतीही भाषा दैनंदिन व्यवहारांच्या पलीकडे जावी लागते. तिच्यातून मानवी अनुभवांची अभिव्यक्ती व्हावी लागते. अशा अनेक अभिव्यक्तींचे संचित भारतीयांकडे इंग्रजीतूनही आहे हिरव्या नंबरप्लेटची मोटारगाडी बॅटरीवर चालवायची, प्रदूषणरहित प्रवासाचे आणि तथाकथित खनिज-इंधनांच्या बचतीचे समाधान या गाडीच्या वातानुकूल थंडाव्यात बसून मिळवायचे पण त्याच वेळी, या गाडीची बॅटरी अखेर कोळशापासून मिळवलेल्या औष्णिक विजेवरच 'रिचार्ज' करावी लागते, हे मात्र विसरायचे- यात जसा आणि जितका विरोधाभास आहे, तसाच पण त्याहून अधिक विरोधाभास परवा सर्वोच्च न्यायालयात घडला. 'इंग्रजी ही भारतीय भाषा नाही' अशा अर्थाचा युक्तिवाद भारताचे महान्यायअभिकर्ता- अर्थात सॉलिसिटर जनरल- तुषार मेहता यांनी बुधवारी सरन्यायाधीशांपुढे केला; तेव्हा खुद्द मेहता इंग्रजीतच बोलत होते! एवढ्यावर हे थांबत नाही शालान्त परीक्षेपर्यंत तीन भाषा शिकणे सक्तीचे करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणामागे हिंदी-सक्ती हाच हेतू आहे, अशी याचिका केली गेली ती अर्थातच इंग्रजीत. तिच्याबद्दल आजवर सारे युक्तिवाद इंग्रजीतूनच झाले. पण 'इंग्रजी परकी' अशा अर्थाचे मूळ सरकारी परिपत्रकसुद्धा इंग्रजीतूनच आहे त्याचे काय? इंग्रजी आद्याक्षरांनुसार 'सीबीएसई' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने हे इंग्रजीविरोधी इंग्रजी परिपत्रक काढले होते. हा केवळ हास्यास्पद विरोधाभास म्हणून सोडून देता येणार नाही. कारण मुद्दा एखाद्या भाषेला नाकारण्याचा आहेच, त्याबरोबरच तो विद्यमान सत्तासंस्थेच्या नैतिकतेबद्दलही वाद निर्माण करणारा आहे. वाद म्हटले की दोन बाजू आल्या. त्यापैकी पहिली बाजू आधी पाहायला हवी.

ही बाजू सरकारची. म्हणून सत्ताधाऱ्यांच्या समर्थकांचीही. ती कागदोपत्री बिनतोड आहे. ती अशी की, भारतीय राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात ज्या २२ भाषांचा समावेश आहे, त्या यादीत इंग्लिश भाषेचा समावेश नाही! हे म्हणणे १०० टक्के खरे- अगदी राज्यघटनेची १९५० सालातली जी मूळ, हस्तलिखित इंग्रजी प्रत काचबंद पेटीत जपून ठेवण्यात आली आहे, तिच्यासुद्धा आठव्या परिशिष्टात १४ भाषा होत्या आणि त्याही यादीत इंग्रजी नव्हतीच! याच राज्यघटनेच्या सर्वाधिक प्रती इंग्रजीतून निघाल्या आहेत, आजवरच्या बहुतेक साऱ्याच घटनादुरुस्त्यांची विधेयके पहिल्यांदा इंग्रजीतून मांडली गेली आहेत. कारण राज्यघटनेच्याच अनुच्छेद ३४८ मध्ये कायदेशीर कामकाज इंग्रजीत करण्याची तरतूद आहे. तीही अशी की, हिंदी अथवा अन्य कुठल्या भाषेत विधेयके मांडली गेली अथवा न्यायालयीन कामकाज अन्य भाषेत झाले, तरी इंग्रजी हवीच! पण याच राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४४ मध्ये राष्ट्रपतींना विशेषतः हिंदीसह अन्य भारतीय भाषांचा वापर सरकारी कामकाजात वाढावा, यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिलेले आहेत आणि आठव्या परिशिष्टात एखाद्या भाषेचा समावेश करण्यासाठी राष्ट्रपतींनी आयोग नेमण्याची तरतूदही आहे. हिंदीला प्रोत्साहन देणे, आठव्या परिशिष्टातल्या भाषांची समृद्धी वाढवणे आणि जपणे, अधिकाधिक संस्कृत-प्रचुर प्रतिशब्द प्राधान्याने तयार करणे हे राष्ट्रपतींचे कर्तव्य असल्याचे अनुच्छेद ३५१ सांगतो. या पार्श्वभूमीवर, 'ज्या अर्थी इंग्रजीचे नाव यादीत नाही, त्या अर्थी इंग्रजी परकी' हा सरकारचा युक्तिवाद आहे. आता दुसरी बाजू. ती मूलतः भाषाप्रेमाची आहे. त्यामुळे ती भावनिक आहे असा आरोप सहज करता येईल. पण भावना विरुद्ध कायदा असे द्वंद्व गेल्या दशकभरातही कैकदा झालेले आहेच की! शेतकरी कायदे किंवा त्याआधीचे भूसंपादन विधेयक यांच्याविरोधात जनभावनेची लाट उभी राहिली, हे विसरून कसे चालेल? आणि आठवायचेच ठरवले तर, ऐन नेहरूयुगात दक्षिणेकडील राज्यांत पेटलेले हिंदीविरोधी आंदोलनही आठवावे लागेल. त्या काळात 'राजकीय विरोध म्हणजेच अराजकवाद' किंवा 'विरोध करणारे 'दिमागी नक्सल', अशी समीकरणे नव्हती, इतकेच. पण त्या वेळी इंग्रजी माध्यमाच्या शाळाही आताइतक्या नव्हत्या! 'इंग्रजांनी आपल्याला पारतंत्र्यात ठेवले- इंग्रज परके- म्हणून इंग्रजीसुद्धा परकीच' हा जर सरकारचा युक्तिवाद असेल, तर तो लोकांना पटत नसल्याचे वाढत्या इंग्रजी माध्यम शिक्षणातूनच दिसतेच आहे. तेव्हाच्या 'सत्तर साल मे' इंग्रजी शाळा वाढत राहिल्या म्हणावे, तर अलीकडच्या डझनभर वर्षांमध्ये त्या आणखीच बोकाळल्याचे दिसते. मुलांना इंग्रजी शाळेत धाडणारे पालक पराभूत मानसिकतेचे असतील, तर 'मनरेगा' या रोजगार हमी योजनेचे फेरबारसे 'जी राम जी' असे करण्यासाठी इंग्रजी आद्याक्षरांच्या कुबड्या काय विजयी म्हणायच्या? वैद्यकीय शिक्षण हिंदीत देण्याचा गाजावाजा या सरकारने केला, त्याचे पुढे काय झाले? थोडक्यात, इंग्रजीला परकी ठरवण्याचे समाधान हे फसवेच ठरणार. फक्त 'सीबीएसई'पुरतेच बोलायचे तर, इंग्रजीला 'फॉरेन लँग्वेज' ठरवल्याने इंग्रजीऐवजी फ्रेंच, जर्मन किंवा हिब्रू, स्वाहिली या इतर परदेशी भाषा शिकण्याचा पर्याय माध्यमिक शाळा देतील का?

नाही देणार आणि देऊही नये. कारण भाषा केवळ कुठल्याशा उल्लेख नसल्याने आपली/ परकी नाही ठरत. कुठलीही भाषा 'आपली' ठरायची असेल तर ती दैनंदिन व्यवहारात रुळावी लागतेच तिथे तर इंग्रजी फारच रुळली आहे आणि 'प्रीपोन'सारख्या नव्या शब्दांची भरही भारतीयांनी घातली आहे पण आपुलकी वाढण्यासाठी कोणतीही भाषा दैनंदिन व्यवहारांच्या पलीकडे जावी लागते. यात मायकल मधुसूदन दत्त, तोरू दत्त, रवीन्द्रनाथ टागोर, सरोजिनी नायडू यांच्यापासून ते निस्सीम इिझकेल, अरविन्द मेहरोत्रा, अरुण कोलटकर अशा अनेक प्रतिभावंतांच्या इंग्रजी कविता आहेत; आर. के. नारायणांची अख्खी 'मालगुडी' आहे आणि मुल्कराज आनंद यांचे नंदपूर आहे, मनोहर माळगावकरांचे संस्थानिक आहेत, जिम कॉर्बेटचे नरभक्षक आहेत आणि रस्किन बॉण्ड यांच्या मसुरी/ डेहराडूनचे जनजीवनही आहे अलीकडल्या काळात अमिताभ घोष ते अरुंधती घोष यांच्या कादंबऱ्या, अमीश यांच्या कल्पितकथा, महेश दत्ताणी, मंजुळा पद्मनाभन यांची नाटके हे संचित इंग्रजी भाषा 'भारताची' म्हणून कुणाही देशातल्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारे आहे. ते सारे शिकवले जाईलच असे नाही. पण ते आहे आणि माध्यमिक शाळांवर समजा हिंदीची सक्ती केलीच, तरी प्रेमचंदांची 'ईदगाह'सारखी कथा किंवा 'गबन' सारखी कादंबरी मुलांना शिकवू देण्याची नियत उरली आहे का आपल्या सत्ताशरण समाजात? ज्या 'आठव्या परिशिष्टा'वर बोट ठेवून सरकार इंग्रजीला अभारतीय ठरवू पाहते, त्यात मराठीच्या नंतर लगेच 'नेपाळी'चा समावेश आहे. सरकारी मदतीवर चालणारी 'साहित्य अकादमी' अन्य भारतीय भाषांप्रमाणेच नेपाळी, मराठी किंवा इंग्रजीसाठीही पुरस्कार देते, 'भारतीय ज्ञानपीठ' हा सन्मान इंग्रजी लेखकालाही मिळू शकतो. पण नेपाळ या भारतापासून निराळ्या, सार्वभौम म्हणजेच परक्या देशाची भाषा आपण 'आपली' मानतो (अधिक माहिती- लोकसंख्या हा निकष आठव्या परिशिष्टास लागू नाही तसे असते तर भोजपुरीचा समावेश 'भारतीय भाषा' म्हणून झाला असताच, तो अद्याप नाही); मग इंग्रजीस आपले मानण्यात हरकत काय? तिचे मूळ सरकारच्या नैतिकतेत शोधावे लागते. अर्धकच्च्या अनुयायांना फसवी समाधाने देत राहण्यासाठी उंच आवाजात बोलत राहायचे प्रत्यक्ष फरक काहीही न पाडता कशाचेही इव्हेन्टीकरण करायचे, ही नीती- आणि त्यामागची नैतिकता आता 'इंग्रजी परकीच' असे बजावण्याच्या मिषाने हिंदीची- तीही हिंदीतल्या प्रागतिकतेला वगळून- सक्ती करू लागली, तर काय नवल? एके काळी इंग्रजी सत्तेशी लढणाऱ्यांनी इंग्रजीला 'वाघिणीचे दूध' म्हटले होते. सरकारला त्या वाघिणीची शिकार केल्याचे समाधान मिळवून काय साधायचे असेल?



अमळनेर : शहरातील रोटरी हॉल येथे मंगळ बालसंस्कार केंद्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम. व्यासपिठावर उपस्थित विश्वस्त डि. ए. सोनवणे, खा. शि. मंडळाच्या विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, पर्यवेक्षक महेश माळी, समोर उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी. (छायाचित्र : नितेश बारी)

# बालवयातच संस्कारांची रुजवण शक्य

## मंगळग्रह सेवा संस्थेंतर्गत मंगल बालसंस्कार केंद्राचा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच नैतिक मूल्ये, शिस्त, स्वच्छता आणि आध्यात्मिक विचारांची रुजवण व्हावी, तसेच शैक्षणिक ज्ञानासोबत संस्कारांचेही महत्त्व त्यांना समजावे, या उद्देशाने मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सुरू असलेल्या मंगल बालसंस्कार केंद्रांतर्गत शनिवारी (दि. १२) शहरातील पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी रोटरी हॉल येथे बालसंस्कार वर्ग घेण्यात आला.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे तीन वर्षांपूर्वी मंगल बालसंस्कार केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी शहरातील विविध शाळांमध्ये बालसंस्कार वर्ग घेऊन विद्यार्थ्यांना संस्कारमय जीवनाचे महत्त्व पटवून दिले जाते.

यावेळी खानदेश शिक्षण मंडळाच्या विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. ए. सोनवणे, तसेच पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलचे पर्यवेक्षक महेश माळी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना विविध मंत्र, बालगीते व बालगोष्टींच्या माध्यमातून शिस्त, स्वच्छता, चांगली दिनचर्या आणि आध्यात्मिक विचार याबाबत मार्गदर्शन केले.

संस्कारमय जीवनाची दिशा बालपणापासूनच मिळणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी हे संस्कार आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वर्गास शिक्षक-शिक्षिकांसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातीची मूर्ती घडवूया, पर्यावरणाचे रक्षण करूया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोटरी क्लब अमळनेर आणि सी. आर. पाटील इंटरनॅशनल स्कूल, तांबेपुरा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (१२ सप्टेंबर) पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरात सकाळी ९ वाजता झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती साकारताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्वही पटवून देण्यात आले.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे विसर्जनानंतर जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. 'मातीची मूर्ती घडवूया, पर्यावरणाचे रक्षण करूया' हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दिला. या उपक्रमासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटे. महेश पाटील, सचिव रोटे. प्रशांत निकम, प्रोजेक्ट चेअरमन रोटे. सुबोध पाटील व रोटे. अजय रोडगे यांनी मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि रोटरी क्लबचे सदस्य रोटे. किरण कुंभार व रोटे. मनोज पाटील यांनी सहकार्य केले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारी ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

## भटक्या कुत्र्यांची नसबंदी, लसीकरण मोहीम सुरू

पान १ वरून

नसबंदी शस्त्रक्रिया व अँटी रेबीज लसीकरण करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेनंतर आवश्यक काळजी घेतल्यानंतर संबंधित कुत्र्यांना पुन्हा त्याच परिसरात सोडण्यात येणार आहे. या मोहिमेची सुरुवात ढेकू रोड परिसरातून करण्यात आली असून, शहरातील इतर भागांतही टप्प्याटप्प्याने कार्यवाही केली जाणार आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्याबरोबरच रेबीजसारख्या गंभीर आजाराचा धोका कमी करण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कुत्रे पकडण्याच्या कार्यवाहीदरम्यान नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनास सहकार्य करावे. तसेच कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अमळनेर नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातर्फे करण्यात आले आहे.

# आठवणीतलं आपलं अमळनेर आणि ते मंतरलेले दिवस!

काळ कोणासाठी थांबत नाही. पण काही आठवणी काळजाच्या कोपऱ्यात अशा काही घर करून बसतात की कुठलंही निमित्त साधून त्या हटकून डोके वर काढतातच. अशाच एका मैत्रिणीच्या भेटीत आठवणींची तार छेडली गेली आणि जे प्रतिध्वनी आले ते तसेच्या तसे आपल्यासमोर ठेवत आहे. बोलता-बोलता एका मागून एक विषय निघत गेले आणि ८०-९० च्या दशकातील अमळनेर जीवंत होत गेलं.

ते दिवस गतिमान व्हायला लागले असले, तरी आजच्यासारखे धावपळीचे नव्हते. पण त्या साधेपणात एक वेगळीच श्रीमंती होती. शहरात एकाच भागात जवळ-जवळ असलेल्या तीन सिनेमा टॉकीजचा पडदा आणि यात्रेचा थाट असा चर्चेचा सूर म्हणता-म्हणता तपशिलात शिरत गेला. तेव्हा नाटक फक्त प्रताप महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात व नवरात्रीत पाचपावली देवीच्या प्रांगणात बघायला मिळायचे. दुसरे मनोरंजनाचे केंद्र म्हणजे अजंता, न्यू लक्ष्मी आणि तंबोली ही तीन थिएटर्स. पंचावन्न पैशांची जमीन, एक रुपया पाच पैशाचे बाक आणि दीड रुपयाची खुर्ची. बाल्कनीची चैन फक्त तंबोलीत मिळायची. दुपारी १२ पासून रात्री ९ ते १२ असे चार शो असायचे. अधूनमधून सकाळी ९ चा मॅटिनी शो देखील असायचा. यात्रेच्या दिवसांत तर रात्रभर चालणारे म्हणजे रात्री १२ ते ३ आणि ३ ते ६ चे देखील शो असायचे. गर्दी कधीच ओसरायची नाही. यात्रा आली म्हणजे 'शोले' आणि 'मेरा गाव, मेरा देश' शिवाय आपली यात्रा पूर्णच व्हायची नाही. सिनेमा कोणता लागला यासाठी त्रिकोणी आकाराची पोस्टर्स लावलेली गाडी, पुढे डफली वाजणारा मुख्य बाजारपेठेतून हिंडायची. तंबोलीचा सिनेमा सगळ्यात उशिरा सुटायचा. शो सुटल्यानंतर गजबजलेला सुभाष चौक, अजंता चौक आणि राणी लक्ष्मी जणू यात्रेची अनुभूती द्यायचा. या चौकातील हॉटेल्स रात्री दोन-तीन वाजेपर्यंत फुल्ल असायची.

चहाची 'बादशाही' चव आणि तीन रुपयांत मिळणारी कमल टी ची चविष्ट पुरी-भाजी सर्वांना हवी-हवीशी वाटणारी होती. लक्ष्मी चौकातील 'कमल टी दोस्ताना' म्हणजे अमळनेरकरांचं दुसरं घरच! तिथली 'बादशाही' चहा म्हणजे अमृतच. कप-बशीला बिलगलेली ती चहा जेव्हा ओठावरून जिभेवर घरंगळत आत जाई, तेव्हा मिळणारे सुख काही औरच होते. अवघ्या दीड रुपयात बादशाही आणि तीन रुपयांत मिळणारी ती चविष्ट पुरी-भाजी! ती रस्सेदार बटाट्याची किंवा मठाची पातळ भाजी आणि आठ मोठ्या पुऱ्यांची चव घेण्यासाठी शहरातील मातब्बर लोकही गर्दी करायचे. कुणाला शोधायचं असेल तर हमखास याच हॉटेलवर चक्कर मारली जायची. मात्र, चेहरा नसलेल्या या गर्दीतही सुरक्षित रात्र आणि सौहार्दाचा चौक अशीच ओळख अनेक वर्षे होती.

डॉ. आंबेडकर चौकातले ते दिवस आजही आठवतात. थकले-भागले मजूर तेथे निवांत बसलेले असायचे. त्यांचा दिवसभराचा ताण येथे जमिनीवर बसून सुसह्य होत असे. येथे रात्री उशिरापर्यंत मिळणारे आम्लेट-पाव, भजी आणि लाल तोंड रंगवणाऱ्या पानांच्या अनेक टपऱ्या होत्या. येथे अमळनेर खऱ्या अर्थाने रात्रभर जागं असायचं. गांधलीपुऱ्याकडची ती छोटी दोन किराणा दुकानं, जी गरज पडली की रात्री-अपरात्री आवाज दिला की उघडली जायची. खरेतर उघडीच असायची, ती केवळ दुकानं नव्हती तर लोकांचा आधार होती. इतकी गर्दी असूनही शहरात कमालीची शांतता आणि सौहार्द होते; ना पोलिसांचा ससेमिरा, ना कुठली भीती! दहा वाजले की पोलिसांच्या शिट्या व तो नकोसा करडा आवाज होता. असेच बोरी नदीचं ते अथांग वाळवंट त्यात फुललेली यात्रा एक अनोखा विषय...
आज बोरी नदीकडे पाहिलं की जुने दिवस आठवतात. ८९ पर्यंत नदीला किमान छोटी धार तरी असायची. यात्रेत गुडघाभर पाण्यातून चालताना खरोखर वाळवंटात फिरल्याचा फिल यायचा. वाळूत छोटा खड्डा केला तरी पिण्यायोग्य गोड पाणी लागायचं. या काळात नगर परिषदेतर्फे मोठी पाणपोई लागायची. नदीत दोन्ही बाजूने मोकळे असलेले पत्री ड्रम गाडून त्यातील पाणी उपसले जाई. ओल्या लाल फडक्यात गुंडाळलेले ते नवे कोरे रांजण आणि सेवा देण्यासाठी आवर्जून विद्यार्थी वर्गाला १५ दिवस रोजगार देणारे त्या काळचे संवेदनशील नगरसेवक. हे सगळं एका सुसंस्कृत समाजाचं दर्शन घडवायचं.

वाफेची इंजिनं आणि कामगारांचा उत्साह हा देखील चैतन्यदायी अनुभव आहे. 'झुकझुक' करत धूर सोडणारी सुरत-भुसावळ पॅसेंजर म्हणजे अमळनेरकरांची जीवनवाहिनी होती. सकाळी आणि रात्री या गाडीच्या वेळी रेल्वे स्टेशनचा परिसर टांगे आणि रिक्षांनी जादुई वातावरणात



न्हाऊन निघायचा. गुजरात जाण्यासाठी विशेषतः सुरत जाण्यासाठी ही पॅसेंजर जितकी महत्त्वाची तितकीच व्यापारी, नोकरदार व विद्यार्थी यांचे साठी जळगाव जाण्या येण्याच्या एक खात्रीशीर स्वस्त व सुरक्षित आधार होती. तिकडे प्रताप मिल आणि विप्रो (डालडा) मुळे शहरात वेगळेच चैतन्य होते. ७ आणि १० तारखेचा पगार म्हणजे जणू सणच! दुपारी ११ आणि संध्याकाळी ७ वाजता डबे घेऊन जाणाऱ्या कुटुंबीयांची तर धावपळ असायचीच, पण लोटगाडीवर घराघरातून डबे गोळा करून जेवणाच्या सुटीआधी पोहोचवणारी ती चार-पाच बाया -माणसं आजही आठवतात. भोंगा झाला की, कामगार आपले डबे घेऊन घोळक्याने जेवायला बसायचे, तो काळच वेगळा होता. भोंगा म्हणजे अमळनेरचे नियोजन करनारी घड्याळ होती. विप्रो, मिल कामगार, शेतकरी हेच अमळनेरच्या आर्थिक उलाढालीचा कणा होते.
पाचपावली मैदान हे देखील संस्कार आणि कलेचं व्यासपीठ होत.
पाचपावली देवीचं भव्य मैदान म्हणजे अमळनेरकरांच्या अभिमानाचं केंद्र. दर रविवारी पोलीस आणि गृहरक्षक दलाची ती देखणी कवायत बघायला शहर लोटायचं. प्रजासत्ताक दिनाचे शालेय कार्यक्रम असोत वा नवरात्रीचा सांस्कृतिक महोत्सव, हे मैदान नेहमीच गजबजलेले असे. आर. के. दादा आणि विनोद भैय्या पाटील यांच्या रसिकतेमुळे मुंबई-पुण्यातील दिग्गज नाटके आणि कलाकार इथे येत आणि मैदान फुल्ल होऊन जाई. येथे नाटकाची भूक भागत असे. तत्कालीन महेश गेस्ट हाऊस समोरील दादावाडी या मोकळ्या जागेत रंगणारा रासगरबा.. आणि गणपती उत्सवात जिकडे तिकडे विविध विषयावर सजलेल्या आरास व चालते बोलते देखावे पाहण्यासाठी एक दिवस फक्त परिवारा सोबत तर एक दिवस मित्रांसोबत असे नियोजन असे.

शिक्षण, निसर्ग आणि बदलता काळ तितकाच संवेदनशील होता.. प्रताप महाविद्यालयाचे ते भरलेले वसतीगृह, स्टेशन रोडवरची विद्यार्थ्यांची वर्दळ आणि नदीपात्रातील मळ्यांमधली ती गावरान काकडी, डांगर, टरबूज. आठवडे बाजार कोंबडी बाजारा कडून न प कडे जाताना थेट मिल चाळ लागी पर्यंत उंचच उंच बुचीची झाडे डवरलेली असायची पांढरी लांबुळकी दूरवर सुगंध देणारी ही झाडांची आता केवळ आठवण आहे. अशीच कचेरी रोडवर गुलमोहराची झाडेही उन्हाळ्यात नटलेली असायची. हे सगळं विसरणं शक्य नाही. कुठे विरंगुळा म्हणून फिरायला किंवा सहलीला जायचं तर राम मंदिर, डुबकी मारुती, वरुणेश्वर, खळेश्वर किंवा अंबरीष टेकडीची वर्षातून एकदा भरणारी सायंकाळची यात्रा इतकीच नावे होती! तेव्हा आजच्यासारखं श्री मंगळग्रह मंदिर विकसित नव्हतं. कुणी आले-गेले तर दाखवायला खास अशी ठिकाणे नव्हती. आज कुणीही आले तरी श्री मंगळग्रह मंदिरावर जाऊन येऊ म्हणत पाहुण्यांना घेऊन सहज पाय वळतात.

मुंबई पुणे वा कोठेही जायचे असेल तर लालपरी आणि सुरत-भुसावळ पॅसेंजर हेच प्रवासाचे मुख्य साधन होते. धुळे-अमळनेर टॅक्सी सेवा सुरू झाल्याने धुळे प्रवास सुसह्य झाला. पुढे प्रा. आर. के. केले यांनी पुणेसाठी पहिली खासगी बस सुरू केली आणि त्यांची कॉपी करत अनेकांनी या व्यवसायात उड्या घेतल्याने प्रवासाची चित्रच बदलली. बसस्थानक ते महाविद्यालय वा कुठेही जायचे तर दोन रुपये तास, दिवसभर सात रुपये तर नाईट तीन रुपये तासाने सायकली मिळायच्या.

पावसाळाही तेव्हा फक्त पावसाळ्यासारखाच असायचा. अपवाद वगळता अवकाळी हा प्रकार अनुभवास आला नाही मात्र एकदा तर अमळनेरमध्ये अशी बर्फवृष्टी झाली होती की जणू शहराचे जणू हिमाचलच झाले होते!

आता गल्लीबोळात नेते मंत्री नेहमी दिसतात, पण पूर्वी आमदार दिसले तरी आज आमदारांना पाहिले, असे तोंड भरून लोक सांगायचे. कधी तरी दिसणाऱ्या आमदारांना बघताना वाटणारा तो आदर आणि माणुसकी आजही आठवते.

आरोग्य सेवा फार विस्तारलेल्या नव्हत्या. निळू वैद्य, नाना वैद्य श्रीकृष्ण वैद्य या अनुभवी वैद्यांसोबत हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सी. बी. शाह, डॉ. सेन, डॉ. चव्हाण, डॉ. रां. का. पाटील, डॉ. बडगुजर, डॉ. किरण व शैला शाह, डॉ. म्हसकर पती-पत्नी नंतर डॉ. अनिल शिंदे पाठोपाठ अनेक डॉक्टर्स व दवाखाने आले. मोजकेच दवाखाने. मुंबई गल्लीतील न. प. दवाखाना आणि देशमुख वाड्यातील सातभाई आयुर्वेदिक दवाखाना म्हणजे सर्वांच्या विश्वासाचे नाव होते. आज त्या प्रवाहातील मंडळी भेटली की हे किस्से सांगताना मन भरून येतं. ८० ते ९० या सुवर्णकाळाचा आम्ही एक भाग होतो, हीच आमच्यासाठी मोठी ठेव आहे.

**– धनंजय सोनार, अमळनेर**
**मो. : ७९७२८ ८१४४०**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# कौन हैं आयपीएस मोहिता शर्मा?

## केबीसी में जीता था एक करोड़ का जैकपॉट; ५ वें प्रयास में पास किया यूपीएससी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवन में जब एक या दो बार असफलता मिलती है, तो कई लोग निराश होकर अपने सपनों को बीच में ही छोड़ देते हैं। लेकिन कुछ जुनूनी लोग ऐसे भी होते हैं, जिनके लिए हर हार केवल अगली बड़ी जीत की तैयारी होती है। ऐसी ही एक प्रेरणादायक और अद्भुत कहानी है आईपीएस अधिकारी मोहिता शर्मा की। मोहिता ने न केवल यूपीएससी जैसी कठिन परीक्षा को पास कर अपने देश सेवा के सपने को पूरा किया, बल्कि टीवी के मशहूर शो 'कौन बनेगा करोड़पति' (केबीसी) में अपनी बुद्धिमत्ता का परचम लहराते हुए एक करोड़ रुपये की भारी धनराशि भी जीती।

**सक्सेस स्टोरी**



### शुरुआती जीवन और बी.टेक.तक की पढ़ाई का सफर

हिमाचल प्रदेश की रहने वाली और दिल्ली में पली-बढ़ी मोहिता शर्मा के पिता एक मारुति कंपनी में काम करते थे और मां गृहणी थीं। साधारण मध्यमवर्गीय परिवार से ताल्लुक रखने वाली मोहिता का सपना हमेशा से देश के प्रशासनिक ऊंचे पदों पर जाकर सेवा करने का था। उन्होंने दिल्ली पब्लिक स्कूल (डीपीएस), द्वारका से १०वीं में ९२.२०% और १२वीं में ९०.७०% अंक हासिल किए। इसके बाद उन्होंने भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग से इलेक्ट्रॉनिक्स एंड कम्युनिकेशन में बी.टेक. की डिग्री पूरी की।

### ४ बार की नाकामी के बाद पाई यूपीएससी में शानदार सफलता

यूपीएससी परीक्षा का सफर मोहिता के लिए बिल्कुल भी आसान नहीं था। उन्हें लगातार ४ प्रयासों में असफलता का सामना करना पड़ा। बार-बार प्रीलिम्स और मेंस में रुक जाने के बाद भी उन्होंने कभी हिम्मत नहीं हारी। अपनी पुरानी गलतियों से सीख लेते हुए उन्होंने २०१७ में अपने ५वें प्रयास में आखिरकार २६२ वीं रैंक हासिल की और भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) के लिए चुनी गईं। उन्हें जम्मू-कश्मीर कैडर मिला।

### केबीसी में एक करोड़ जीतकर रच दिया इतिहास

वर्ष २०२० में केबीसी १२ (केबीसी १२) के दौरान मोहिता शर्मा हॉटसीट पर बैठीं। उस समय वे एक से बढ़कर एक कठिन प्रश्नों के सटीक और बेबाक जवाब देकर अमिताभ बच्चन सहित पूरे देश का दिल जीतने में सफल रहीं। अपनी पढ़ाई, अनुशासन और ज्ञान के दम पर वे केबीसी १२ की दूसरी करोड़पति बनीं। सदी के महानायक अमिताभ बच्चन भी उनकी समझदारी और सूझबूझ से काफी प्रभावित हुए।

### छात्रों के लिए मोहिता शर्मा का संदेश

आयपीएस मोहिता शर्मा मानती हैं कि असफलताएं जीवन का हिस्सा हैं। यदि आप अपनी गलतियों से सीखते हैं, सोशल मीडिया के भटकाव से दूर रहते हैं और अपने लक्ष्य पर ध्यान केंद्रित रखते हैं, तो सफलता एक दिन आपके कदम जरूर चूमेगी। आज मोहिता शर्मा देश की उन लाखों लड़कियों के लिए एक आदर्श हैं जो अपनी मेहनत और लगन से हर बाधा को पार कर आसमान छूना चाहती हैं।

# नेपाळमध्ये रविवारी साप्ताहिक सुट्टी का नसते?

## कशामुळे आहे जगावेगळी परंपरा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अद्वितीय ओळख नेपाळ केवळ नैसर्गिक सौंदर्यासाठीच नाही, तर आपल्या वेगळ्या परंपरांसाठीही जगभर ओळखला जातो. सुमारे ९० टक्के लोकसंख्या हिंदू असूनही येथील साप्ताहिक सुट्टी इतर देशांपेक्षा वेगळी आहे.

**जगाच्या तुलनेत वेगळी पद्धत**

जगभरात सामान्यतः रविवारी सुट्टी असते. मात्र नेपाळमध्ये रविवार हा कामाचा दिवस असतो. शाळा, महाविद्यालये आणि कार्यालये रविवारी नेहमीप्रमाणे सुरू असतात.

**शनिवारी साप्ताहिक सुट्टी**

नेपाळमध्ये शनिवारी साप्ताहिक सुट्टी असते. सरकारी कार्यालये, बँका, शाळा आणि बहुतेक खाजगी कार्यालये शनिवारी बंद राहतात. त्यामुळे बाजारपेठांमध्येही तुलनेने कमी वर्दळ दिसते.

**कामाचा आठवडा**

नेपाळमधील कामाचा आठवडा रविवार ते शुक्रवार असा असतो. रविवार हा आठवड्याचा पहिला कामाचा दिवस मानला जातो.

**राणा राजवटीतील परंपरा**

ही पद्धत राणा राजवटीच्या काळातील आहे. विशेषतः जुद्ध शमशेर यांच्या राजवटीत शनिवारी सुट्टी लागू करण्यात आली होती आणि ती आजतागायत कायम आहे.

**ख्रिश्चन प्रभावाचा अभाव**

युरोप, अमेरिका आणि अनेक देशांत रविवारची सुट्टी ख्रिश्चन परंपरेशी जोडलेली आहे. नेपाळ कधीही ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली नसल्यामुळे येथे ख्रिश्चन प्रभाव नगण्य होता. त्यामुळे रविवारची सुट्टी स्वीकारली गेली नाही.

**सांस्कृतिक, धार्मिक कारण**

नेपाळी संस्कृतीत शनिवारी नवीन काम सुरू करणे शुभमानले जात नाही. हा दिवस विश्रांती आणि धार्मिक उपासनेसाठी योग्य समजला जातो.

**स्वतंत्र राष्ट्र**

नेपाळ हा अशा मोजक्या देशांपैकी एक आहे जो कधीही वसाहत बनला नाही. भारताला मुघल आणि ब्रिटिश राजवटीचा सामना करावा लागला, पण नेपाळ नेहमीच स्वतंत्र राहिला.

**पशुपतिनाथ यांचे महत्त्व**

भगवान पशुपतिनाथ हे नेपाळचे राष्ट्रदैवत मानले जातात. काठमांडूमधील त्यांचे भव्य मंदिर देशाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक ओळखीचे प्रतीक आहे.

**आजही कायम परंपरा**

राणा काळातील ही प्रथा आणि सांस्कृतिक समजुतींमुळे शनिवारी सुट्टीची पद्धत नेपाळमध्ये अजूनही सुरू आहे. ही परंपरा देशाच्या स्वतंत्र आणि वेगळ्या ओळखीचे प्रतीक बनली आहे.

# नेहमी एकट्याने जेवता?

## या सवयीचा मानसिक आरोग्यावर होतोय गंभीर परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक लोक एकटेच जेवतात. ऑफिसमधील दुपारच्या जेवणाची सुट्टी असो किंवा घरातील रात्रीच्या जेवणाची वेळ असो, बरेच लोक आपल्या फोन किंवा लॅपटॉपसमोर एकटेच जेवतात.

**गंभीर परिणाम**

ही सवय सुरुवातीला क्षुल्लक वाटू शकते. परंतु तज्ज्ञांच्या मते सातत्याने एकटे जेवण्याचा मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

**वेळापत्रक**

घरातून काम करणे, व्यस्त वेळापत्रक आणि सोशल मीडियाचा वाढता वापर यांमुळे लोक कुटुंब आणि मित्रांसोबत जेवण करण्यापासून विचलित होत आहेत.

**जेवण**

बरेच लोक घाईघाईने जेवण उरकतात, तर काही जण एकटेपणामुळे एकटेच जेवणे पसंत करतात. ही सवय हळूहळू इतकी सामान्य झाली आहे की लोकांच्या तिच्या परिणामाकडे लक्षही जात नाही.

**भावनिक बंध**

तज्ज्ञांच्या मते एकत्र जेवण केल्याने केवळ पोटच भरत नाही, तर भावनिक बंधही निर्माण होतात. जेव्हा आपण कुटुंब किंवा मित्रांसोबत जेवतो, तेव्हा आपण गप्पा मारतो, हसतो.

**संधी**

दिवसाच्या तणावातून थोडा विसावा घेतो. मात्र एकट्याने जेवताना ही संधी मिळत नाही. ज्यामुळे हळूहळू एकटेपणाची भावना निर्माण होऊ शकते.

**तणाव**

एकटे जेवल्याने व्यक्तीला इतरांपासून वेगळे पडल्यासारखे वाटू शकते. यामुळे तणाव आणि चिंतेचा धोका वाढतो. काही अभ्यासांमधून असेही दिसून आले आहे, की जे लोक वारंवार एकटे जेवतात.

**व्यत्यय**

त्यांच्यामध्ये उदासी आणि खिन्नता जाणवण्याची शक्यता अधिक असते. याशिवाय, एकटे जेवताना फोन पाहण्याची किंवा टीव्ही बघण्याची सवय सजगतेने जेवण्याच्या पद्धतीत व्यत्यय आणू शकते.

# किडनी स्टोन असणाऱ्यांनी तूप सोडावे का? जाणून घ्या खरे काय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



किडनी स्टोन म्हणजे मूत्रपिंडात काही खनिजे आणि क्षार स्फटिकांच्या स्वरूपात जमा होऊन तयार झालेला खडा. आजकाल कमी पाणी पिणे, जास्त मीठ असलेला आहार, प्रक्रिया केलेले पदार्थ, काही प्रकारच्या आहारातील अतिरेक आणि शारीरिक हालचालींचा अभाव यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित घटकांमुळे काही लोकांमध्ये किडनी स्टोनचा धोका वाढू शकतो. मात्र, केवळ जीवनशैलीमुळेच प्रत्येक व्यक्तीला किडनी स्टोन होतो असे नाही. आनुवंशिकता, शरीरातील चयापचयाशी संबंधित समस्या, काही औषधे आणि आधी किडनी स्टोन झालेला असणे यांसारखे इतर घटकही त्यामागे असू शकतात.

**किडनी स्टोन असणाऱ्यांनी तूप खावे की नाही?**

किडनी स्टोन झाला आहे म्हणून तूप पूर्णपणे बंद करावे, असा सार्वत्रिक नियम नाही. तूप हे चरबीचा स्रोत आहे आणि किडनी स्टोनच्या बहुतांश प्रकारांमध्ये तूप थेट खडा तयार करते असे म्हणता येत नाही. मात्र, तूप हा उच्च-कॅलरी पदार्थ असल्याने त्याचे प्रमाण मर्यादित ठेवणे योग्य ठरते. विशेषतः ज्या व्यक्तींच्या आहारात आधीच तूप, लोणी, तळलेले पदार्थ आणि इतर चरबीयुक्त पदार्थ मोठ्या प्रमाणात असतील, त्यांनी एकूण चरबीचे प्रमाण लक्षात घेणे आवश्यक आहे.

**किडनी स्टोनमध्ये तुपापेक्षा महत्त्वाचे काय?**

किडनी स्टोनच्या प्रतिबंधात पुरेसे पाणी पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पुरेसे द्रवपदार्थ घेतल्याने लघवी पातळ राहण्यास आणि काही प्रकारचे खनिज स्फटिक तयार होण्याचा धोका कमी करण्यास मदत होते. मात्र, प्रत्येक व्यक्तीने नेमके किती पाणी प्यावे हे हवामान, शारीरिक हालचाल, आरोग्यस्थिती आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ठरवावे.

**मिठाचे प्रमाण कमी करणे हेदेखील महत्त्वाचे आहे.** आहारातील जास्त सोडियममुळे लघवीत कॅल्शियमचे प्रमाण वाढू शकते आणि काही प्रकारच्या किडनी स्टोनचा धोका वाढू शकतो, त्यामुळे पॅकेज्ड स्नॅक्स, चिप्स, लोणची, पापड आणि अतिमिठाचे पदार्थ कमी करणे फायदेशीर ठरू शकते.

**कॅल्शियम पूर्णपणे बंद करू नका**

किडनी स्टोन असलेल्या व्यक्तींनी दूध, दही किंवा इतर कॅल्शियमयुक्त पदार्थ पूर्णपणे बंद करावेत हा गैरसमज आहे. विशेषतः कॅल्शियम ऑक्सलेट स्टोन असणाऱ्या व्यक्तींमध्ये आहारातून योग्य प्रमाणात कॅल्शियम मिळणे महत्त्वाचे असू शकते. मात्र, कॅल्शियम सप्लिमेंट घ्यायचे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**ऑक्सलेटयुक्त पदार्थांबाबत काळजी**

कॅल्शियम ऑक्सलेट स्टोनचा इतिहास असलेल्या काही व्यक्तींना आहारातील ऑक्सलेटचे प्रमाण कमी करण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो. पालक, बीट, शेंगदाणे, काही नट्स आणि चॉकलेट यांसारख्या पदार्थांमध्ये ऑक्सलेट असते. मात्र, सर्व किडनी स्टोन रुग्णांनी हे पदार्थ पूर्णपणे बंद करावेत असे नाही. स्टोनचा प्रकार आणि व्यक्तीच्या वैद्यकीय स्थितीनुसार आहारातील बदल ठरवणे अधिक योग्य आहे.

**तूप किती खावे?**

किडनी स्टोन असताना तूप पूर्णपणे टाळण्याऐवजी मर्यादित प्रमाणात घेणे अधिक योग्य ठरू शकते. मात्र जर डॉक्टरांनी वजन, कोलेस्ट्रॉल किंवा इतर कारणांमुळे चरबीचे प्रमाण कमी करण्यास सांगितले असेल तर त्यांच्या सल्ल्याला प्राधान्य द्यावे. किडनी स्टोनचा उपचार केवळ आहारातील बदलांनी होईलच असे नाही. खड्याचा प्रकार, आकार आणि स्थान यानुसार उपचार बदलतात. कंबरेच्या किंवा पोटाच्या बाजूला तीव्र वेदना, लघवीत रक्त, ताप, उलट्या किंवा लघवी करताना तीव्र त्रास होत असल्यास वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे.

# मान वाकडी करून एका डोळ्याने कावळा काय बघतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कावळ्याला दोन डोळे असून तो फक्त एका डोळ्याचा वापर करतो असं म्हटलं जातं. पण त्याचं कारण काय असेल माहिती का?

**दोन डोळे**

कावळ्याला दोन डोळे असतात, परंतु एखाद्या वस्तूकडे पाहताना तो डोळ्यानं करतो. याला मोनोक्युलर व्हिजनशी जोडले जाते.

**पाहण्यासाठी मदत**

तसेच कावळ्यांचे डोळे डोक्याच्या दोन्ही बाजूंना असल्यामुळे त्यांना आजूबाजूचा परस्पर पाहण्यासाठी मदत होते.

**३६० डिग्री दिसते**

कावळ्यांना ३६० डिग्री दिसत असल्याचाही दावा करण्यात आलाय. त्यांची नजर विशेष प्रभावी असल्याचेही मानले जाते.

**लक्षात ठेवणे**

कावळे बुद्धिमान पक्ष्यांपैकी एक मानले जातात. त्यांना वस्तू ओळखणं, लक्षात ठेवणं यासाठी दृष्टी मदत करते.

**चेहरा लक्षात ठेऊ शकतात**

कावळ्याची दृष्टी इतकी तीक्ष्ण असते, की ते एखाद्या व्यक्तीचा चेहरा लक्षात ठेवू शकतात, असे संशोधनातून समोर आले आहे.

**हुशार पक्ष्यांपैकी एक**

दृष्टी, स्मरणशक्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता यामुळे कावळे पक्षीजगतातील सर्वांत हुशार जीवांपैकी एक मानले जातात.



# भंगाराच्या व्यवसायातून तीन कोटींवर साम्राज्य उभे करणारे अब्जाधीश

## ४५,५०० कोटींचा मालक मुले आणि महिलांना दान करणार ७५ टक्के संपत्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीमंत झाल्यावर अनेकदा लोकांना आपल्या संपत्ती भर पडायची असते आणि भावी पिढ्यांसाठी वाचवण्याची असते, पण काही जण वेगळा विचार करतात. यामध्ये वेदांता ग्रुपचे चेअरमन अनिल अग्रवाल यांचाही समावेश आहे. वेदांताचे संस्थापक अनिल अग्रवाल यांनी ७५ टक्के संपत्ती दान करण्याची प्रतिज्ञा केली आहे.

वेदांताचे संस्थापक आणि सर्वेसर्वा अनिल अग्रवाल यांचा प्रवास संघर्ष, यश आणि आता समाजसेवेचे जीवंत उदाहरण आहे. भंगाराच्या व्यवसायातून सुरूवात करून अब्जावधी डॉलर्सचे व्यावसायिक साम्राज्य उभारणाऱ्या अग्रवाल यांनी आपल्या संपत्तीचा मोठा हिस्सा दान करणार आहेत. सामाजिक कार्य आणि लोककल्याणासाठी आपली ७५ टक्के संपत्ती दान करण्याचे या वर्षाच्या सुरूवातीला वचन दिले होते. काही महिन्यांपूर्वी झालेल्या डीमर्जरआधी तीन कोटी दोन लाखांवरून तीन कोटी ६६ लाख रुपयांपर्यंत वाढ झाल्यामुळे भागधारकांच्या मूल्यात अंदाजे ४९,००० ते ६३,५००० कोटींची भर पडली.



### अनिल अग्रवाल कोणाचे आयुष्य घडवणार

व्यवसायातून कमावलेल्या पैसा किंवा संपत्तीवर फक्त आपल्या कुटुंबाची मालमत्ता नसावी, तर त्यातील मोठा भाग समाजात गुंतवला गेला पाहिजे असा अनिल अग्रवाल यांचा नेहमीच असा विश्वास राहिला आहे. म्हणूनच त्यांनी आपली ७५ टक्के संपत्ती सामाजिक कामासाठी दान करण्याची प्रतिज्ञा केली जेणेकरून गरीब आणि गरजू लोकांच्या जीवनात परिवर्तन घडू शकेल.

### कोणत्या कामासाठी वापरला जाणार पैसा

जानेवारी २०२६ मध्ये अनिल अग्रवाल यांचा मुलगा अग्निवेश अग्रवाल यांचे निधन झाले आणि त्यानंतर वेदांता संस्थापकांनी आपला निर्धार व्यक्त केला. देशातील एकही मूल उपाशी झोपू नये, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही मुलाच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, महिलांना आत्मनिर्भर होण्याची संधी मिळावी आणि तरुणांना सन्मानजनक रोजगार मिळावा, हे त्यांच्या कुटुंबाचे स्वप्न असे त्यांनी सांगितले. ही सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आता संपत्तीचा मोठा हिस्सा वापरला जाईल, असे अग्रवाल यांनी म्हटले.

### मुले आणि महिलांवर फोकस

अनिल अग्रवाल यांचे परोपकारी कार्य शिक्षण, पोषण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यावर केंद्रित असून त्यांचा प्रमुख प्रकल्प, 'नंद घर', देशभरातील अंगणवाडी केंद्रांना आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्याचा उपक्रम आहे. या केंद्रांचा उद्देश मुलांना उत्तम पोषण आणि प्राथमिक शिक्षण देणे, तसेच महिलांना कौशल्य प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेच्या संधी उपलब्ध करून देण्याचा आहे. तसेच भारताचे भक्कम भविष्य घडवण्यासाठी मुले आणि महिलांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

### अनिल अग्रवाल यांच्या मुळे समाजाला काय संदेश मिळतो

आपल्या संपत्तीपैकी ७५% संपत्ती दान करण्याचा त्यांचा निर्णय भारतीय उद्योगविश्वाला शक्तिशाली संदेशही देतो. खरा वारसा केवळ कंपन्या आणि मालमत्तेपुरता मर्यादित नसतो, तर व्यक्तींनी आपल्या साधनांद्वारे समाजात घडवलेल्या बदलातून निर्माण होतो.

### अनिल अग्रवाल यांची कहाणी

अनिल अग्रवाल यांचा प्रवास संघर्ष, यश आणि आता समाजसेवेकडे वळलेल्या यशाची कहाणी आहे. बिहारमधील पाटणा येथील रहिवासी असलेल्या अनिल अग्रवाल यांनी एक लहान भंगार व्यवसाय सुरू केला आणि हळूहळू वेदांतासारख्या जागतिक व्यावसायिक समूहाचा पाया रचला. तर आता आपल्या संपत्तीकडे वैयक्तिक कर्तृत्वापेक्षा जास्त सामाजिक जबाबदारी म्हणून पाहतात.




# यंदा हरितालिका व श्रीगणेश चतुर्थी एकाच दिवशी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्यसिद्धांतीय देशपांडे पंचांगानुसार सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी भाद्रपद शुक्ल तृतीया सकाळी ०८:२१ वाजता समाप्त होऊन चतुर्थी सुरू होते. ही चतुर्थी मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ०९:०५ वाजता समाप्त होत असल्याने धर्मशास्त्रीय निर्णयानुसार हरितालिका व्रत व श्रीसिद्धिविनायक गणेश चतुर्थी ही दोन्ही व्रते दि. १४ सप्टेंबरलाच आहेत.

हरितालिकेच्या निर्णयाविषयी माधवाचार्य म्हणतात–

**मुहूर्तमात्रसत्त्वेऽपि**
**दिने गौरीव्रतं परे ।**
**शुद्धाधिकायामप्येवं**
**गणयोगप्रशंसनात् ॥**

अर्थात उत्तरदिवशी तृतीया मुहूर्तमात्र असली तरी चतुर्थीच्या संयोगामुळे तो दिवस गौरीव्रतासाठी ग्राह्य होतो. म्हणून दि. १४ सप्टेंबरला सूर्योदयकाली प्राप्त झालेली तृतीया हरितालिकेस प्रशस्त आहे.

येथे एक सूक्ष्म धर्मशास्त्रीय भेद लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. औदयिक वा नियत कर्मकाळातील तिथिसंबंध हा त्या दिवसाला व्रताची शास्त्रीय ग्राह्यता देतो; परंतु तिथी संपताच पूजेचा अधिकारही संपतो, असा नियम त्यातून होत नाही. म्हणून तृतीया सकाळी ०८:२१ वाजता संपते. याचा अर्थ हरितालिकेचे सर्व पूजोपचार त्यापूर्वीच पूर्ण झाले पाहिजेत, असा नाही.

**हरितालिका :** पूजेला प्रातःकालाचे प्राधान्य असल्याने शक्यतो सकाळी पूजन करणे उत्तम.

श्रीगणेश चतुर्थीविषयी बृहस्पतिवचन आहे

**चतुर्थी गणनाथस्य**
**मातृविद्धा प्रशस्यते ।**
**मध्याह्नव्यापिनी सा तु**
**परतश्चेत् परेऽहनि ॥**

येथे मातृविद्धा म्हणजे तृतीयाविद्धा चतुर्थी. तसेच

**गणपतिकल्पात– प्रातः**
**शुक्लतिलैः स्नात्वा मध्याह्ने**
**पूजयेन्नृप ।**

असा स्पष्ट निर्देश असल्याने श्रीसिद्धिविनायक–व्रतात मध्याह्नव्याप्तीला प्रधानत्व आहे.

यंदा दि. १४ सप्टेंबर रोजी चतुर्थी मध्याह्नकाळ व्यापत असल्याने श्रीगणेशांची स्थापना व प्राणप्रतिष्ठा सूर्योदयापासून दुपारी ०१:४५ पर्यंत करता येईल; तर गणेश चतुर्थीचे विशेष पूजन सकाळी ११:१५ ते दुपारी ०१:४५ या मध्याह्नकाळात करणे विशेष प्रशस्त आहे.

हरितालिका व सिद्धिविनायक ही दोन स्वतंत्र व्रते आहेत. त्यामुळे 'हरितालिकेची पूजा पूर्ण झाल्याशिवाय श्रीगणेशांची प्राणप्रतिष्ठा करता येणार नाही' किंवा 'गणेशपूजन झाल्यानंतर हरितालिका करता येणार नाही' असा कोणताही अनिवार्य पूर्वापर विधी नाही. हरितालिकेस प्रातःकाल आणि श्रीगणेशांच्या प्रधान पूजेस मध्याह्नकाळ हे आपापले प्रशस्त कर्मकाल आहेत.

हरितालिकेचा उपवास दि. १४ सप्टेंबर रोजी करून, दि. १५ सप्टेंबरला उत्तरपूजा व विसर्जनानंतर पारणा करावा.

## कसा आहे हा दुर्मिळ योग? जाणून घेऊ



**हरितालिका व श्रीगणेश चतुर्थी एकाच दिवशी**
**हा विशेष योग यापूर्वी व पुढे केव्हा?**

सूर्यसिद्धांतीय देशपांडे पंचांगानुसार मागील ५० वर्षांत (१९७६ ते २०२५) १९७६, १९७७, १९८६, १९९१, १९९५, १९९७, १९९८, २०००, २००९, २०१०,२०१९ आणि २०२३, २०२६.
पुढील ३० वर्षांत (२०२७ ते २०५६)
२०२८, २०२९, २०३२, २०३३, २०३८, २०४७, २०४८ आणि २०५३.



## गणपती बाप्पाला घरी आणताना मूर्ती रुमालाने का झाकतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पांच्या आगमनाची प्रत्येक भक्त आतुरतेने वाट पाहत असतो. पण तुम्ही कधी लक्ष दिले आहे का बाप्पाची मूर्ती घरी आणताना अनेक जण ती रुमाल किंवा वस्त्राने झाकतात?

यामागे कोणता कठोर धार्मिक नियम आहे का? नाही!

मूर्ती झाकण्याची पद्धत सर्वत्र बंधनकारक धार्मिक नियम नाही. मात्र, अनेक कुटुंबांमध्ये बाप्पाचा सन्मान, पावित्र्य जपणे आणि वाईट नजर लागू नये, या श्रद्धेतून ही परंपरा पाळली जाते.

याशिवाय बाप्पा यांना घरी आणताना प्रवासादरम्यान धूळ–माती लागू नये किंवा मूर्तीला कोणताही धक्का लागू नये, यासाठीही मूर्तीवर स्वच्छ वस्त्र झाकले जाते.

घरी पोहोचल्यानंतर स्थापना करण्यापूर्वी हे वस्त्र काढून बाप्पांची विधिवत पूजा–अर्चा केली जाते. म्हणजेच, बाप्पांची मूर्ती रुमालाने झाकणे हा सक्तीचा धार्मिक नियम नसून अनेक घरांमध्ये श्रद्धा, सन्मान आणि परंपरेचा भाग आहे.

**यंदा गणेश चतुर्थी १४ सप्टेंबर २०२६**

गणेशस्थापनेचा मुहूर्त साधारण सकाळी ११:१६ ते दुपारी १:४४ असा सांगितला जातो. स्थानिक पंचांगानुसार मुहूर्ताच्या वेळेत फरक असू शकतो. परंपरा वेगवेगळ्या असल्या, तरी भक्ती एकच

**"गणपती बाप्पा मोरया!"**

## श्री गणेश प्रतिमेत आढळणाऱ्या प्रमुख हस्तमुद्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अभयमुद्रा :** तळहात समोर, बोटे वर निर्भयता, संरक्षण आणि आश्वासनाचे प्रतीक.
**वरदमुद्रा :** तळहात खाली किंवा भक्ताच्या दिशेने वरदान, कृपा आणि फलप्राप्तीचे प्रतीक.
**ज्ञानमुद्रा / चिन्मुद्रा :** अंगठा आणि तर्जनी यांचा स्पर्श ज्ञान, आत्मबोध आणि चैतन्याचे प्रतीक. काही गणेशरूपांत ही मुद्रा आढळते.
**ध्यानमुद्रा :** हात मांडीवर ठेवून ध्यानस्थ स्थिती योग, एकाग्रता आणि अंतर्मुखतेचे प्रतीक.
ही विशेषतः योग / ध्यानस्वरूप
**गणेशप्रतिमांमध्ये महत्त्वाची :**
**तर्जनीमुद्रा :** तर्जनीचा विशिष्ट निर्देशात्मक वापर उपदेश, मार्गदर्शन किंवा चेतावणीचा अर्थ संदर्भानुसार घेतला जातो आणि काही वेळा 'मुद्रा' समजल्या जाणाऱ्या हातातील वस्तू.
**पाश :** आसक्ती व बंधनांवर नियंत्रण.
**अंकुश :** मन व इंद्रियांना योग्य मार्गावर ठेवण्याचे प्रतीक.
**मोदक :** ज्ञानाचे व साधनेच्या फलाचे प्रतीक.
**परशू / कुठार :** अज्ञान व आसक्तीचा नाश.
**कमळ :** निर्मळता व आध्यात्मिक उत्कर्ष. म्हणून गणपतीच्या मूर्तीचे शास्त्रीय स्वरूप सांगताना.
'मुद्रा' आणि 'आयुधे' यांची गल्लत करू नये. अभय व वरद या मुद्रा आहेत. तर पाश, अंकुश, मोदक, परशू इत्यादी आयुधे / धारण केलेल्या वस्तू आहेत.



# देव ओळखावा । जन्म सार्थकी लावावा ।

परम स्नेही मित्र हो,

**क्रमी वेळ जो तत्त्व चिंतानुवादे ।**
**न लिंपे कदा दंभ वादे विवादे ।**
**करी सुख संवाद जो उगमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५२॥**

या श्लोकातील पहिले दोन चरण समर्थांना अभिप्रेत असलेल्या साधकाच्या दिनचर्येचे दर्शक आहेत. साधकाने आपले रोजचे जीवन व्यतीत करताना वाचन, चिंतन, मनन या मार्गाने घालवावे, असे अभिप्रेत आहे. वास्तविक सर्वांना सारखा वेळ मिळालेला असतो. म्हणजे दिवसाचे २४ तास आपल्या सगळ्यांना सारखेच मिळतात. परंतु या उपलब्ध वेळेचा योग्य पद्धतीने सदुपयोग करणे हे सर्वस्वी आपल्या मनावर अवलंबून असते.
ज्याने आपल्या मनाच्या वारूचा लगाम विवेकाच्या हाती दिलेला आहे त्याला मात्र वेळेचा सदुपयोग करणे सहज शक्य होते. 'वेळेचा सदुपयोग' हा विषय केवळ वेळेचे नियोजन करण्यापुरता मर्यादित न ठेवता वेळ, जीवन, माणूसपण आणि आत्मचिंतन यांना जोडला तर तो सत्कारणी लागण्याची शक्यता जास्त असते.




**वेळ म्हणजे आयुष्यच म्हणावे.**
पैसा वित्त गेले तर ते परत मिळविता येते; पण हातून निघून गेलेली वेळ परत काहीही केले तरी परत येत नाही. वेळ वाया घालविणे म्हणजे आयुष्याचा एक मौल्यवान तुकडाच वाया घालविणे.

घड्याळाच्या काट्याप्रमाणे दमछाक होईपर्यंत धावणे किंवा चिंता करीत वेळ घालविणे हे मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या देखील थकवा आणणारे काम. माणूस मात्र भूतकाळाच्या आठवणीत आणि उद्याच्या काळजीत आजचा हाती असलेला वेळ गमावत राहतो. आपण अनेकदा म्हणतो, की मला खूप काही करायचे आहे. पण वेळच मिळत नाही. ही एक लंगडी सबब आपली आवडती असते. तसे पाहिले तर अलीकडे मोबाईल, सोशल मीडिया, त्यावरील निरर्थक चर्चा, दुसऱ्यांच्या आयुष्यातील अनावश्यक डोकावणे, चिंता आणि तक्रार या वर अनावश्यक आपण व्यक्त होत राहतो. त्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष काहीही संबंध आपल्या आयुष्याशी नसतो. एखाद्या विषयावर आपल्या अहंकाराला आव्हान दिले जाते. त्यातून नकळत वाद निर्माण होतात. त्यातून अधिकच मनस्ताप वाट्याला येतो. हे चक्र अधिकच फिरत राहते. यात किती वेळ वाया जातो याचा आपण विचार करीत नाही.

बऱ्याचदा दिवसातून थोडा वेळ काहीही न करता शांत बसणेही आयुष्यात आवश्यक असते. ही क्षणभर विश्रांती म्हणजे वेळेचा अपव्यय नाही. उलट त्यामुळे मनाला स्थिरता लाभून आतला संवाद करायला मिळालेली संधी असते. पुढे वय वाढले की वेळेची किंमत, महत्त्व कळत जाते. तरुणपणी वेळ भरपूर असल्यासारखा वाटतो. वय वाढत जाते तसे तसे मागे वळून पाहताना जाणवते. अरे, एवढा वेळ कधी निघून गेला? हाती काहीही भरभक्कम लागलेले नसते आणि मग मनात विषण्णता जाणवत राहते. उदासी भरून राहते. यास्तव समर्थ वेळेचा सदुपयोग करायला सांगतात. वाचन, लेखन, चिंतन, मनन, नामस्मरण यात घालविलेला वेळ ही एक गुंतवणूकच असते. निसर्गात भटकंती, कुटुंबासाठी वेळ, मित्रांशी संवाद, एखाद्याला मदत, समाजासाठी काही करणे हेही वेळेचे सुंदर उपयोग आहेत. जे मनाला आणि व्यक्तिमत्त्वाला पोषक ठरतात. स्वतःसाठी दिलेला वेळ आपल्याला स्वतःशी संवाद साधायला शिकवतो. दिवसातून थोडा वेळ स्वतःला भेटण्यासाठी राखणे हा देखील वेळेचा सदुपयोग आहे.

**करी सुख संवाद जो उगमाचा...**

हे चरण मात्र जरा गांभीर्याने घ्यावे असे आहे. आपल्या अवतीभोवती चराचरात जे चैतन्य भरून राहिले आहे त्या चैतन्याचा निर्माता कोण? ते कोणामुळे आले? याचा विचार करणे म्हणजे 'तत्त्व' जाणून घेणे.
समर्थांनी दासबोधात 'आपणच आपला शोध घ्यावा,' असे सांगितले आहे.

**माझे शरीर, ऐसे म्हणतो । तरी जाण देहावेगळाचि तो । मन माझे, असे जाणतो । तरी तो मनहि नव्हे ।**
**पाहता देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ।**
**तत्वे तत्व झाडिता सार । आत्माच उरे ।**
**तत्वांचे गाठोडे शरीर । याचा पाहता विचार ।**
**एक आत्मा निरंतर । आपण नाही ।**
**देह बुद्धीने बांधला । तो विवेके मोकळा केला ।**
**देहातीत होता पावला । मोक्ष पद ।**

पुढे समर्थ वाट आणखी स्पष्ट करतात...

**ब्रह्मा, विष्णू आणि हर । त्यासी निर्मित तोचि थोर । तो ओळखावा परमेश्वर ।नाना यज्ञे करूनी ।**
**जेणे संसारी घातले । अवघे ब्रम्हांड निर्माण केले ।**
**त्यासी नाही ओळखीले । तोचि पतीत ।**
**म्हणून देव ओळखावा । जन्म सार्थकची करावा ।**
**न कळे तरी सत्संग धरावा । म्हणजे कळे ।**
**देव ओळखावा एक । तेची ज्ञान हे सार्थक**
**येर अवघेच निरर्थक । पोट विद्या ।**

मनोबोधाच्या या वाटेवर पदोपदी समर्थ आपल्याला सर्वोत्तम दास होण्याच्या दृष्टीने 'मना सज्जना' म्हणत भेटत राहतात.

**जय जय रघुवीर समर्थ..!**

**–भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : ९४२०३८९५४१.**


## गणेशोत्सवात बाप्पाला अर्पण करा ११ दिवसांचा विशेष नैवेद्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणेशोत्सव हा श्रद्धा, उत्साह आणि भक्तीचा मोठा सण मानला जातो. श्री गणरायाचे आगमन झाल्यानंतर घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये बाप्पाच्या पूजेसोबतच त्यांना दररोज विविध प्रकारचा नैवेद्य दाखवण्याची परंपरा आहे. गणपती बाप्पाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचा कृपाशीर्वाद प्राप्त करण्यासाठी ११ दिवसांच्या उत्सवात कोणता नैवेद्य अर्पण करावा, याची विशेष माहिती खालीलप्रमाणे आहे :

**पहिला दिवस :** उकडीचे/तळलेले २१ मोदक, दुर्वा आणि लाल फुले.
**दुसरा दिवस :** बेसनाचे खमंग लाडू.
**तिसरा दिवस :** केळी आणि गूळ.
**चौथा दिवस :** नारळ आणि नारळाची बर्फी.
**पांचवा दिवस :** पारंपरिक तांदळाची खीर.
**सहावा दिवस :** विविध मोसमी फळे (सफरचंद, डाळिंब, द्राक्ष इत्यादी).
**सातवा दिवस :** मालपुआ किंवा पुरी.
**आठवा दिवस :** पेढे किंवा दुधाच्या पदार्थांपासून बनवलेली मिठाई.
**नववा दिवस :** मध आणि पंचामृत.
**दहावा दिवस :** रव्याचा शिरा किंवा हलवा.
**अकरावा दिवस (अनंत चतुर्दशी / विसर्जन) :** मोदक, लाडू व क्षमतेनुसार सात्विक मिठाई.

शास्त्रात आणि परंपरेत गणरायाला मोदक अतिशय प्रिय मानले जातात. त्यासोबतच दररोजच्या या सात्विक नैवेद्यामुळे घरातील वातावरणात सकारात्मकता आणि मांगल्य वाढते.



## १४ सप्टेंबर गणेश चतुर्थी : बाप्पांची घरच्या घरी शास्त्रोक्त पद्धतीने स्थापना कशी कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पांच्या स्थापनेची शुभ वेळ, पूजा विधी, नैवेद्य आणि विसर्जन सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणेश चतुर्थीच्या शुभ पर्वावर घरच्या घरी शास्त्रोक्त पद्धतीने गणपती बाप्पांची स्थापना आणि पूजा कशी करावी. ते जाणून घेऊया.

१. स्थापना आणि पूजेची सर्वांत शुभ वेळ (शुभ मुहूर्त) शास्त्रानुसार गणपतींची स्थापना आणि पूजा नेहमी मध्यान्ह काळात (दुपारी) करणे उत्तम मानले जाते.

**मध्यान्ह पूजा मुहूर्त :** सकाळी ११:१० ते दुपारी ०१:४०
सकाळचा चौघडिया (शुभ–लाभ) : सकाळी ०६:१० ते सकाळी ०९:१०
**दुपारचा चौघडिया (अमृत) :** दुपारी ०१:४० ते दुपारी ०३:१०

**२. शास्त्रोक्त पूजा विधी चौरंग व वस्त्र :** पूजेची जागा स्वच्छ करून ईशान्य किंवा उत्तर दिशेला पाट अथवा चौरंग मांडावा. त्यावर नवीन लाल किंवा पिवळे वस्त्र अंथरावे.

**अक्षता व मूर्ती स्थापना :** वस्त्रावर तांदळाची रास (अक्षता) ठेवून त्यावर बाप्पांच्या मूर्तीची स्थापना करावी. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेकडे असावे.

**संकल्प व प्राणप्रतिष्ठा :** हातात पाणी, अक्षता आणि फूल घेऊन पूजेचा संकल्प करावा. दुर्वा आणि फुलाने पाणी शिंपडून बाप्पाची प्राणप्रतिष्ठा करावी.

**षोडशोपचार अर्पण :** बाप्पांना अष्टगंध किंवा चंदन, हळद–कुंकू लावावे. तांबडी जास्वंदाची फुले आणि २१ दुर्वांची जुडी अर्पण करावी. धूप, दीप दाखवून मनोभावे प्रार्थना करावी.

**३. नैवेद्य (भोग)उकडीचे मोदक :** श्री गणेशांचा सर्वांत प्रिय नैवेद्य म्हणजे तांदळाच्या पिठीचे व गूळ–खोबऱ्याचे २१ उकडीचे मोदक.

**इतर नैवेद्य :** मोतीचूर लाडू, पंचामृत, ताजी फळे (विशेषतः केळी) आणि पंचखाद्य.

**आरती :** नैवेद्य दाखविल्यानंतर 'सुखकर्ता दुखहर्ता' आणि 'सिंदूर लाल चढावो' या आरत्या म्हणाव्यात.

**४. उत्तरपूजा आणि विसर्जन विधीविसर्जन कालावधी :** आवडीनुसार व परंपरेनुसार दीड दिवस, ५ दिवस, ७ दिवस किंवा १० दिवसांनी (अनंत चतुर्दशी) विसर्जन केले जाते.

**उत्तरपूजा :** विसर्जनाच्या आधी मूर्तीची शेवटची पूजा (उत्तरपूजा) करावी. बाप्पाला हळद–कुंकू, दुर्वा अर्पण करून अक्षता वाहाव्यात आणि आरती करावी.

**विसर्जन प्रक्रिया :** 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!' या जयघोषात मूर्ती हळूच थोडी पुढे सरकवावी. त्यानंतर वाहत्या पाण्यात किंवा पर्यावरणपूरक कृत्रिम तलावात मूर्तीचे विसर्जन करावे.

# भाद्रपद मासारंभ : सण, व्रते आणि परंपरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यंदा १२ सप्टेंबर रोजी भाद्रपद मास सुरु झाला आहे. या महिन्यात गौरी, गणपती आणि पितृपक्ष असे तीन महत्त्वाचे सण येतात. या व्यतिरिक्त अन्य व्रतांचेही या महिन्यात पालन केले जाते, हिंदू कालगणनेनुसार चैत्र वैशाख आदी मासांमध्ये भाद्रपद हा सहावा महिना! या महिन्याच्या पौर्णिमेला किंवा तिच्या आधी अथवा नंतर 'पूर्वाभाद्रपदा' हे नक्षत्र येते. त्यामुळे या मासाला भाद्रपद असे नाव प्राप्त झाले. याला नभस्य असे आणखी एक नाव आहे. तर केरळ प्रांतात हा महिना 'अवनी' म्हणून ओळखला जातो. ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांच्या 'धर्मबोध' या ग्रंथातून भाद्रपद मासाबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.

श्रावणापासून ज्या मासाची उत्सुकतेने वाट पाहिली जाते तो हा महिना समस्त हिंदुधर्मीयांच्या, त्यातही मराठी माणसांच्या आनंदाला गणेशभक्तीचे उधाण आणण्याचे काम हा भाद्रपद महिना करतो. कारण या महिन्यात भगवान श्रीगणेशाचे घराघरात, चौकाचौकात आगमन होते. शिव पार्वतीचा पूत्र म्हणून श्रीगजानन गणेशाने भाद्रपद शुक्ल चतुर्थीला जन्म घेऊन त्या महिन्याचे महत्त्व वाढवले आहे.

भगवान शिव शंकर आणि देवी पार्वती ही अखिल जगाची पिता माता म्हणून मान्यता पावलेली असली तरी त्यांच्यावर पहिला अधिकार कार्तिकेय आणि श्रीगजाननाचाच! त्यामुळे गणपतीच्या आगमनापूर्वीच म्हणजे भाद्रपद शुक्ल प्रतिपदेपासून पुढे संपूर्ण महिनाभर विविध तिथीला कधी एकत्रितपणे तर कधी भगवान शिवशंकरासाठी, तर कधी माता पार्वतीसाठी अनेक पूजा व्रत विधी सांगितली गेली आहेत. यापैकी हरतालिकेसारखी व्रतेही मनासारखा पती मिळावा म्हणून योजली गेलेली दिसतात. तर गौरी तृतीया, गौरी व्रत, गौरी चतुर्थी, गौरी गणेश चतुर्थी, गौरीचा सण, बृहत्गौरी व्रत, कोटीसंवत्सरव्रत, अमुक्ताभरण अशी काही व्रतेही अधिकाअधिक पुत्रप्राप्ती, संततीच्या रक्षणासाठी, कल्याणासाठी रूढ झालेली दिसतात. बहुला चतुर्थी, पूत्रकामव्रत, शिवपार्वतीपूजन, चंद्रषष्ठी व्रत, पुत्रिय व्रत, दुर्गात्रीरात्र व्रत, उमा महेश्वर व्रत ही व्रते गणपतीसारखा गुणी पूत्र आपल्याला देखील व्हावा अशा ईच्छेतून पूर्वापार केली जातात.याशिवाय महाराष्ट्रात 'ज्येष्ठागौरी'चे वेगळे आणि विशेष महत्त्व आहे. तीन दिवसांच्या या गौरी व्रतांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे या गौरीचे आवाहन अनुराधा नक्षत्रावर, पूजन ज्येष्ठा नक्षत्रावर आणि विसर्जन मूळ नक्षत्रावर केले जाते. या ज्येष्ठा गौरी महालक्ष्मी, धान्यलक्ष्मी, गणपतीची आई, अशा वेगवेगळ्या भावनेने पुजल्या जातात. कुलाचाराप्रमाणे त्याचे स्वरूप आणि नैवेद्यही वेगवेगळे असतात.



प्रामुख्याने कोकणात तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्याच्यावर देवीचे चित्र असलेल्या कागदाचा मुखवटा बांधला जातो. काही ठिकाणी नदीवरचे पाच खडे गौरी म्हणून आणले जातात. तर कुठे चांदीचा, पितळेचा अथवा शाडूच्या मातीचा मुखवटा असतो. अनेक घरांमध्ये देवीला तिखटाचा नैवेद्य दाखवण्याचा वहिवाट आहे.

भाद्रपदामध्ये इतरही काही विशेष म्हणता येतील अशी व्रत वैकल्ये केली जातात. त्यापैकी एक म्हणजे, भाद्रपद शुद्ध अष्टमीला काही घरांमधून, तसेच अनेक मंदिरातून भागवत पुराणकथनाचा सप्ताह सुरू केला जातो, त्याची सांगता पौर्णिमेला होते. महाराष्ट्रापेक्षा दक्षिणेकडे आणि गुजरात प्रांतात तो अधिक प्रमाणात केला जातो. तसेच या अष्टमीला गुरुवार असेल तर तो गुर्वाष्टमी मानतात. या योगावर गुरुप्रतिमेची पूजा केली जाते.

भाद्रपद पौर्णिमेला इंद्रासाठी विशेष यज्ञ केला जातो. भाद्रपदाचा कृष्ण पक्ष हा 'पितृपक्ष' म्हणून पाळला जातो. आपल्या वाडवडिलांच्या श्राद्धकर्मासाठी तो खास राखून ठेवला गेला आहे. या मासात गणपती दहा किंवा अकरा दिवसांचा पाहुणचार घेण्यासाठी येतात. अनंत चतुर्दशीला गावाला परत जातात, तर गौरी तीन दिवसाच्या माहेरपणाला येतात. एकूणच पितरांची आठवण, ऋषींचे स्मरण, व्यासांच्या भागवत पुराणाचे पारायण अशा विविध पातळ्यांना स्पर्श करणारा तसेच देवादिकांसह अखिल चराचराला स्वतःमध्ये सामावून घेणारा हा भाद्रपद महिना सर्वांना आवडतो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)